# प्रजासत्ताक दिन भाषणे –

## भाषण क्रमांक 1 -

आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष, माननीय मुख्याध्यापक, वंदनीय शिक्षक वृंद आणि माझ्या विद्यार्थी मित्रांनो आजच्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने मला बोलण्याची मोठी संधी दिल्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो.

आज आपल्या देशाचा 74 वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यासाठी आपण सर्व येथे जमलो आहोत. आपल्या सर्वांसाठी हा एक उत्तम आणि शुभ अवसर आहे. आपण एकमेकांचे अभिनंदन केले पाहिजे आणि आपल्या राष्ट्राचा विकास आणि समृद्धीसाठी प्रार्थना केली पाहिजे. आम्ही प्रत्येक वर्षी 26 जानेवारीला प्रजासत्ताक दिन साजरा करतो कारण या दिवशी भारतीय राज्यघटना अस्तित्वात आली आणि 1950 पासून प्रजासत्ताक दिन साजरा करत आहोत. 1950 पासून आपला देश जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश म्हणून ओळखला जातो. येथील लोक आपल्या नेत्याची निवड स्वतः करू शकतात. डॉक्टर राजेंद्र प्रसाद हे भारताचे पहिले राष्ट्रपती होत. 1947 मध्ये आपण प्रदेशांच्या राजवटीपासून स्वातंत्र्य मिळाल्यापासून आपल्या देशात बरीच प्रगती झाली आहे आणि आपला देश विकसित देशांमध्ये गणला जात आहे. विकासाबरोबरच असमानता सारख्या काही उणीवा देखील उद्भवल्या आहेत. आपल्या देशाला जगातील सर्वोत्तम देशांपैकी एक बनविण्यासाठी आज समाजातील अशा समस्यांचे निराकरण करण्यासाठी आपण एकतेचे वचन घेणे आवश्यक आहे. मी माझे दोन शब्द संपवतो.

जय हिंद ! जय भारत !

## भाषण क्रमांक 2 -

शाळा सजवा, काढा रांगोळ्या करु या तयारी !

आली हो आली 26 जानेवारी !!

वाजत गाजत साजरा करू हा राष्ट्रीय सण !

कारण आहे तो आपला प्रजासत्ताक दिन !!

सन्मानिय व्यासपीठ व्यासपीठावरील आदरणीय प्रमुख पाहुणे, माझे प्रिय शिक्षक आणि माझ्या प्रिय देशवासियांनो,

आज आपला भारत देश आपला प्रजासत्ताक दिन मोठ्या थाटामाटात साजरा करत आहे. हा आपला महत्त्वाचा राष्ट्रीय सण आहे. या शुभ प्रसंगी तुम्हा सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या खूप खूप शुभेच्छा.

15 ऑगस्ट 1947 ला आपला देश ब्रिटिश राजवटीपासून स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यानंतर आपला देश नीट चालवण्यासाठी कोणताही नियम व कायदा नव्हता. त्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली स्थापन केलेल्या समितीने 2 वर्षे 11 महिने 18 दिवसांच्या अथक परिश्रमानंतर भारताची मजबूत राज्यघटना तयार केली.

26 जानेवारी 1950 रोजी भारत देशाने आपली राज्यघटना लागू केली. त्यावेळी आपला देश सार्वभौम प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून घोषित करण्यात आला होता. आपल्या देशाचे संविधान हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे. या महान संविधानाने आपल्याला आपल्या हक्कांसाठी आणि हक्कांसाठी लढण्याचे बळ दिले आहे.

आपला देश स्वतंत्र आणि प्रजासत्ताक करण्यासाठी अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या प्राणाचीही पर्वा केली नाही. आज आपण त्या सर्व शूर वीरांना मनापासून स्मरण करतो, त्यांच्यामुळेच आज आपण शांततेचा श्वास घेत आहोत. स्वातंत्र्याच्या वर्षांनंतरही आपल्या देशाचे शूर सैनिक सीमेवर शत्रूंचा मुकाबला करत जीव तळहातावर घेत आहेत. मातृभूमीसाठी ते मरायला सदैव तयार असतात.

शेवटी जाता जाता एवढेच म्हणेन....

लहरतो आहे तिरंगा अभिमानाने,

उंच आज या आकाशी,

उजळत ठेवू सारे रंग त्याचे,

घेऊया प्रण हा एक मुखाने

Kitestudy

## भाषण क्रमांक - 3

सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा मित्रांनो.... प्रजासत्ताक दिन हा दिवस प्रत्येक भारतीयासाठी फार महत्त्वाचा आहे. भारताचा प्रजासत्ताक दिन दरवर्षी जानेवारी महिन्याच्या 26 तारखेला साजरा केला जातो. 15 ऑगस्ट 1947 ला आपला देश स्वतंत्र झाला पण त्याची लोकशाही राज्यघटना 26 जानेवारी 1950 या दिवशी अमलात आली. म्हणून हा दिवस प्रजासत्ताक दिन म्हणून मानला जातो.

आमचा भारत हे एक मोठे लोकशाही राज्य आहे. म्हणजे लोकांचे, लोकांनी लोकांसाठी चालविलेले राज्य. या संमेलनाचा मुख्य कार्यक्रम भारताची राजधानी दिल्ली येथे होतो. या कार्यक्रमात भारताची सर्व घटक राज्ये सहभागी होतात. भारताच्या सर्व क्षेत्रातील वैभवाचे दर्शन घडू दे म्हणून मोठी मिरवणूक काढतात. प्रत्येक राज्यात, जिल्ह्यात, तालुक्यात, गावागावातून प्रजासत्ताक दिन साजरा होतो. शाळांपासून ते सरकारी कार्यालयापर्यंत तसेच तो अन्यत्रही साजरा केला जातो. सकाळी ध्वजवंदन आणि मनोरंजनाचे कार्यक्रम होतात. ठीकठिकाणी प्रभात फेऱ्यातून देशभक्ती प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. मुलांचा आणि विविध क्षेत्रात कर्तृत्व गाजवणाऱ्या चा या दिवशी सरकार तर्फे गौरव केला जातो आणि प्राथमिक शाळेतील मुलांना खाऊ दिला जातो. मुलेही आनंदित असतात. तोरणे, पताका, आपले तिरंगी ध्वज लावले जातात. लहान- मोठी मुले तिरंगी ध्वज मोठ्या उत्साहाने हातात घेऊन भारत मातेचा जय घोष करीत प्रभातफेरीत भाग घेतात.

सर्व विद्यार्थी, शिक्षक मुख्याध्यापक यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण केले जाते. शाळेतील एनसीसी स्काऊट गाईडचे विद्यार्थी सूत्रसंचालन करतात. शाळेतील वाद्यवृंदाने दोन्ही राष्ट्रीय गान वाजू लागतात. तसेच मुले, मुली आपल्या आवडीची गीत गायन करतात. भाषणे करतात. नंतर सर्वजण एकात्मतेची शपथ घेतात. मुख्याध्यापकांकडून गुणी विद्यार्थ्यांचे कौतुक केले जाते. त्यांना सन्मानपत्र दिले जाते. या दिवशी संपूर्ण देशभरात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण दिसून येते. पण निव्वळ आजचा दिवस साजरा करून आपली जबाबदारी संपत नाही. मित्रानो खरे तर हा प्रतिज्ञेचा दिवस. आजच्या दिवस प्रत्येक भारतीयांनी या महत्वाच्या दिवशी देशासाठी हितकारक कार्य करण्याची प्रतिज्ञा केली पाहिजे आणि त्यानुसार वागले पाहिजे. असे राष्ट्रीय दिन साजरे केल्याने प्रत्येकाच्या मनातील राष्ट्रीय भावना जागृत होऊन राष्ट्रीय भावना जागृत होते.

सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा....

जय हिंद ! जय भारत !

Kitestudy

## भाषण क्रमांक 4 -

26 जानेवारी हा भारताचा प्रजासत्ताक दिन दर वर्षी मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. यालाच गणराज्यदिन असेही म्हटले जाते. 26 जानेवारी 1950 रोजी भारताचे संविधान अंमलात आले 15 ऑगस्ट रोजी भारताला ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारताचे स्वतंत्र भारताचे संविधान नव्हते. संविधान तयार करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली गेली. त्यानंतर 26 जानेवारी 1950 रोजी संपूर्ण भारतासाठी संविधान लागू करण्यात आले. 26 जानेवारी या दिवशी राष्ट्रीय उत्सव म्हणून या दिवशी शाळा कार्यालयामध्ये प्रजासत्ताक दिन साजरा केला जातो. विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व, निबंध चित्रकला स्पर्धा आयोजित केली जातात आणि ठीकठिकाणी देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. देशातील नागरिक या दिवशी तिरंगी रंगाचे झेंडे इत्यादींचा वापर करून घर ऑफिस सुशोभित करतात. लोक एकमेकांना गणराज्य दिनाच्या शुभेच्छा देतात. संपूर्ण देशात उत्साहाचे वातावरण दिसून येते. असा हा प्रजासत्ताक दिन साजरा करतात व त्यामुळे प्रत्येकाच्या मनात राष्ट्रप्रेम अधिक उजळून निघते.

KiteStudy

## भाषण क्रमांक 6 -

मानानीय अध्यक्ष महोदय, मंचावर उपस्थित सर्व प्रतिष्ठित व्यक्ती, शिक्षक आणि माझ्या सर्व मित्र आणि मैत्रिणींनो मी ............... ज्या कारणासाठी आपण येथे एकत्र झालो आहोत ते म्हणजे भारताचा 74 वा गणतंत्र दिवस म्हणजेच प्रजासत्ताक दिन साजरा करण्यासाठी. भारताला 15 ऑगस्ट 1947 रोजी स्वातंत्र्य मिळाले. पण त्या स्वातंत्र्याला आकार मिळाला तो म्हणजे 26 जानेवारी 1950 रोजी. ज्या संविधानावर आपण आज आपला देश उभा आहे त्याला काही अंशी आपण विसरत चाललोय. देशाला परतंत्रातून स्वतंत्र करण्यासाठी आपल्या पूर्वजांनी वर्षानुवर्षांच्या गुलामगिरी विरुद्ध लढताना अंग्रेजी सरकारचे अत्याचार सहन केले. हसत हसत फाशीच्या दोरखंडाचे चुंबन घेतलं आणि तेव्हाच पाहता आली 15 ऑगस्ट 1947 ची पहाट. स्वातंत्र्याची पहाट.

मला या गोष्टीचं वाईट वाटतं जेव्हा आजचा तरुण फोन लावून बाईक जोरात चालवताना विसरून जातो त्या धरतीलाजिचा इंच आणि इंच मिळविण्यासाठी माझ्या पूर्वजांनी जीवाचे रान केले. मला वाईट वाटतं जेव्हा त्याच्या खांद्यावर जबाबदारी आहे कुटुंबाची, राष्ट्रनिर्मितीची. समाजाच्या आशा आकांक्षांना एकत्र बांधून ठेवण्याची. तो आज मला पब्जी मध्ये डुबलेला आणि दारू मध्ये गुंतलेला दिसतो. मित्रानो, केवळ सैन्यात भरती होऊन राष्ट्रभक्ती सिद्ध करता येत नाही. तर इमानदारीने केलेले प्रत्येक काम आणि कामात कर्तव्यदक्षतेचे पालन करणं म्हणजे आहे देशभक्ती.

आपलं राष्ट्र निर्मितीचे स्वप्न तेव्हाच पूर्णत्वास जाईल जेंव्हा शेतकऱ्याच्या शेतात आपण पाणी पोहोचवू शकू, देशात वाढणारी बेरोजगारी, देशात वाढणारी गरीबी, वाढणारा अत्याचार आपण पूर्णपणे थांबवू.

आपलं राष्ट्र निर्मितीचे स्वप्न त्यावेळी पूर्ण होईल ज्यावेळेस देशातील प्रत्येक गरिबातील गरीब विद्यार्थ्याला सुद्धा एक चांगलं शिक्षण मिळेल. आपण रक्तदान करून एका माणसाला जीवनदान देऊ. आपण झाडे लावून पर्यावरणा चा समतोल राखू. असे केल्याने आपण एक दिवस नक्की आपल्या देशाला जगातील सर्वात नंबर वन बनवू शकतो.

## भाषण क्रमांक 5 –

**नमस्कार, सन्माननीय अध्यक्ष, मंचावर उपस्थित अतिथी गण, शाळा समितीचे अध्यक्ष, उपस्थित सर्व सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, आमच्या शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग, उपस्थित पालक, आणि माझ्या बाल मित्र-मैत्रिणींनो.**

**सर्वप्रथम सर्वांना 74 व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...**

**मी ........... आज आपल्याला या भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त दोन शब्द सांगणार आहे ते आपण शांत पणे ऐकावे अशी नम्र विनंती...**

**उत्सव तीन रंगांचा आज सजला...**

**नतमस्तक मी त्या सर्वांचा ज्यांनी देशासाठी इतिहास घडवला...**

**माननीय अध्यक्ष महोदय, वंदनीय शिक्षकवर्ग, येथे उपस्थित सर्व देश बांधवांनो. आज 26 जानेवारी हा प्रजासत्ताक दिन म्हणून आपण उत्साहात साजरा करीत आहोत. हा दिवस प्रत्येकासाठी आनंदाचा आणि अभिमानाचा दिवस आहे. या मंगल दिनी तुम्हा सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...**

**मित्रहो 15 ऑगस्ट 1947 आपला भारत देश इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला. पण गरज संविधानाची होती त्या शिवाय देशाचा राज्य कारभार सुरळीतपणे चालणार नव्हता. आपल्या जनतेला स्वाभिमान आणि शांतपणे जगता यावे म्हणून संविधान निर्मितीचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वामध्ये नेमलेल्या संविधान मसुदा समितीने 2 वर्ष 11 महिने 18 दिवस अथक परिश्रम घेऊन देशाचे संविधान तयार केले.**

**26 जानेवारी 1950 रोजी आपल्या देशात संविधान अमलात आले. देश प्रजासत्ताक म्हणून घोषित करण्यात आला. या देशाचे संविधान हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान बनले. कोणत्याही भेद्भावाशिवाय सर्वांना समान हक्क अधिकार मिळालेले आहेत. आपल्या देशाला स्वतंत्र प्रजासत्ताक करण्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी आपल्या जिवाची पर्वा केली नाही. आज त्या सर्व शूरवीरांना आपण वंदन करूया. कारण त्यांच्यामुळे आज आपण मुक्त श्वास घेत आहोत, जे सैनिक देशाच्या सीमेवर अहोरात्र मातृभूमीच्या सेवेसाठी सज्ज आहेत सन्मान करूया.**

**जय हिंद ! जय भारत !**

Kitestudy

## English SpeechNo. 1 -

Good morning everyone. My name is ............ Today is 26 January. At first I wish you all a very happy Republic Day. This year we are celebrating our 74th Republic Day.

India became republic on 26 January 1950. It is very important day in the history of India. On this day in 1950 the constitution of our country was formally adopted. Dr Babasaheb Ambedkar who is called the father of our constitution. We should understand the importance of this great day.

Jay Hind Jay Bharat

KiteStudy

## English SpeechNo. 2 -

Respected Principal, teachers, and my dear friends,

First of all, I would like to thank you for giving me such a great opportunity to speak on Republic Day. Today, we have gathered together to celebrate the 73rd Republic Day of our country today and this is an auspicious occasion for everyone and I am very happy about it!

We should congratulate each other for our hard work and the great things we have done for this country. In India, we celebrate republic day every year because the constitution of india came into force on this date.

We are celebrating Republic Day of India since the Constitution came into force in 1950 because it was ratified by all provinces and states on 26 January that year and became a reality for us.

The supreme power of the people living in a country is called "republic". Only the people have this right to choose their representatives as political leaders to lead their country in the right direction. Therefore, India is a republic country where the people choose their leader as the Prime Minister.

Our heroes in India fought for freedom and that is why we enjoy freedom today. They sacrificed their lives to give us our present day country.

India is a democratic country where the people choose their leader to lead them. Dr Rajendra Prasad was the first president of India. Ever since we got independence from British rule in 1947, our country has developed a lot and is counted among the most powerful countries.

The development of technology has made life easier for many people and it can bring problems too such as inequality, poverty, unemployment and corruption. To make our country the best country in the world, we need to take a pledge today to solve such problems in society.

And now, I am going to end my speech with these words: Thank you so much for listening.

Jay Hind Jay Bharat